**ठळक बातम्या**

- भारत टेक्स प्रदर्शनातून भारतीय संस्कृती आणि विकसित भारताच्या भविष्याचं चित्र दिसत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- नवी दिल्ली स्थानकावरच्या दुर्घटनेच्या चौकशीसाठी रेल्वेची समिती स्थापन/ दुर्घटनेची जबाबदारी स्वीकारुन रेल्वेमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी काँग्रेसची मागणी

- गेल्या पंधरवड्यात भारतीय भांडवल बाजारातून २१ हजार २७२ कोटी रुपयांची परदेशी गुंतवणूक माघारी

**आणि**

- बार्सिलोना इथं झालेल्या अर्ध-मॅरेथॉन स्पर्धेत युगांडाच्या जेकब किप्लिमोचा ५७ मिनिटांपेक्षा कमी वेळात शर्यत पूर्ण करण्याचा विश्वविक्रम

**<><><><><><>**

भारत टेक्स प्रदर्शनातून भारतीय संस्कृती आणि विकसित भारताच्या भविष्याचं चित्र दिसत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं आयोजित भारत टेक्स २०२५ मध्ये ते बोलत होते. भारत टेक्स आता जागतिक पातळीवरचा महोत्सव झाला असून हे प्रदर्शन जगभरातल्या कापड उद्योजकांसाठी एक चांगलं व्यासपीठ बनलं आहे. वेगवेगळ्या देशांची कापड संस्कृतीविषयीच्या माहितीची देवाणघेवाण या प्रदर्शनाच्या निमित्ताने होत आहे, असंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

गेल्यावर्षी आपण कापड उद्योगात फार्म, फायबर, फॅब्रिक, फॅशन आणि फॉरेन या पाच घटकांविषयी बोललो होतो. हे धोरण आता भारतासाठी महत्त्वपूर्ण धोरण

झालं आहे. या धोरणातून शेतकऱ्यांपासून ते व्यापाऱ्यांपर्यंत प्रगतीच्या नव्या वाटा मिळत आहेत. आपण जगातले सर्वात मोठा कापड निर्यातदार देश आहोत. आतापर्यंत तीन लाख कोटींपर्यंत ही निर्यात झाली असून २०३० पर्यंत हीच रक्कम ९ लाख कोटींवर घेऊन जाणं हेच आपलं लक्ष्य आहे, असंही मोदी यावेळी म्हणाले.

भारत टेक्स हे आंतरराष्ट्रीय पातळीवरचं भव्य वस्त्रोद्योग प्रदर्शन असून ते उद्यापर्यंत सुरू राहणार आहे. यामध्ये कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनांपर्यंत विविध उत्पादनं आणि यंत्रसामुग्रीचा समावेश आहे. प्रदर्शनाबरोबरच विविध चर्चासत्र आणि प्रशिक्षण कार्यक्रमही घेतले जात आहेत. नवोन्मेष उपक्रम आणि स्टार्ट अप दालन तसंच हॅकेथॉनवर आधारित स्टार्टअप पिच फेस्ट आणि निधी योजना असे कार्यक्रम, तसंच डिझाइन स्पर्धाही घेण्यात येत आहेत . ५ हजार हून अधिक प्रदर्शक, १२० हून अधिक देशांतील ६००० आंतरराष्ट्रीय खरेदीदार आणि इतर विविध अभ्यागत या प्रदर्शनात सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

<><><><><><>

नवी दिल्ली स्थानकावर काल रात्री चेंगराचेंगरी होऊन किमान १८ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी उत्तर रेल्वेचे मुख्य वाणिज्य व्यवस्थापक नरसिंह देव आणि मुख्य सुरक्षा आयुक्त पंकज गंगावार यांची समिती रेल्वेनं नेमली आहे. या समितीनं स्थानकावरचे सीसीटीव्ही फूटेज राखून ठेवायचे निर्देश दिले आहेत.

प्रयागराजला जाणाऱ्या गाड्यांमध्ये चढण्यासाठी अचानक अलोट गर्दी झाली होती. फलाट क्रमांक १४ आणि १५ वर उतरण्यासाठी असलेल्या पुलावरुन उतरताना काहीजण घसरले त्यामुळे गर्दीतली माणसं एकमेकांवर कोसळल्यामुळे चेंगराचेंगरी झाल्याचं उत्तर रेल्वेच्या मुख्य जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितलं. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दहा लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

नवी दिल्ली स्थानकावर परिस्थिती आता नियंत्रणात असल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. नवी दिल्ली स्थानकावरची गर्दी कमी करण्यासाठी दिल्लीहून प्रयागराजला जाण्यासाठी तात्काळ चार गाड्या सोडल्या असल्याचंही त्यांनी सांगितलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही अश्विनी वैष्णव तसंच दिल्लीच्या नायब राज्यपालांशी चर्चा केली. जखमींना तत्काळ आवश्यक ती मदत पुरवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. दुर्घटनेत मरण पावलेल्यांच्या प्रियजनांचं त्यांनी सांत्वन केलं असून जखमी झालेल्यांना लौकर बरं वाटावं, अशी कामना केली आहे. प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनीही दुर्घटनेबद्दल तीव्र शोकभावना प्रकट केली आहे.

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या दुर्घटनेची बातमी दुःखद आणि वेदनादायक आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दुःख व्यक्त केलं आहे. महाकुंभातून आणलेल्या गंगाजलाचा लाभ घेण्यासाठी नागपूरमधे आयोजित कार्यक्रमानंतर ते बातमीदारांशी बोलत होते.

**<><><><><><>**

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरच्या दुर्घटनेची जबाबदारी स्वीकारुन  रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी राजीनामा द्यावा अशी  मागणी काँग्रेसनं केली आहे. काँग्रेसच्या पक्ष प्रवक्ता सुप्रिया श्रीनेत यांनी आज नवी दिल्लीत  पत्रकार परिषद घेतली. दुर्घटनेच्या वेळी बचावकार्याऐवजी सरकार आकडे लपवण्यात गुंतलं होतं असा आरोप त्यांनी केला. दुर्घटनेच्या आधी तासाभरात पंधराशेहून अधिक तिकिटं विकली गेली होती, त्यामुळे रेल्वेला गर्दीचा अंदाज यायला हवा होता, असं त्या म्हणाल्या.

**<><><><><><>**

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्ली इथं आदी महोत्सव २०२५ चं उद्घाटन झालं. या कार्यक्रमात त्यांनी गेल्या १० वर्षात आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक प्रभावी पावलं उचलण्यात आल्याचं प्रतिपादन केलं. आदिवासी लोकांच्या परंपरा आणि राहणीमान देशाची संस्कृति समृद्ध करतात, असं त्या म्हणाल्या. यंदाच्या अर्थसंकल्पात आदिवासींसाठी आर्थिक तरतूद तिपटीनं वाढवली असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं .

<><><><><>

हिंदू समाज हा अतिशय जबाबदार समुदाय असून हिंदू समाजाने एकत्र राहणं महत्त्वाचं असल्याचं मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केलं. ते आज पश्चिम बंगालमध्ये वर्धमान जिल्ह्यातल्या कार्यक्रमाला संबोधित करत होते.

<><><><><>

भारतीय भांडवली बाजारामधून परदेशी गुंतवणूकदारांनी फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात २१ हजार २७२ कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली आहे. जानेवारीत एकंदर ७८ हजार २७ कोटी रुपयांची परदेशी गुंतवणूक झाली होती. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इतर देशांमधून आयात मालावर अतिरिक्त शुल्क आकारण्याची घोषणा केल्यानंतर परदेशी गुंतवणूकदार संस्थांनी सावध पवित्रा घेतला असावा, असं बाजार वर्तुळातल्या तज्ञांचं मत आहे.

<><><><><>

बार्सिलोना इथे झालेल्या अर्ध-मॅरेथॉन स्पर्धेत युगांडाच्या जेकब किप्लिमो या खेळाडूने ५७ मिनिटांपेक्षा कमी वेळात शर्यत पूर्ण करत एक विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. त्याने ५६ मिनिटं, ४२ सेकंदात ही शर्यत पूर्ण केली. त्याने इथियोपियाच्या योमिफ केजेलचा याने केलेला ५७ मिनिटं ३० सेकंदांचा जुना विक्रम मोडला.

<><><><><><>

महिलांच्या प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज बडोद्यात कोटंबी इथं यूपी वॉरियर्स आणि गुजरात जाएट्स यांच्यात सामना सुरू आहे. गुजरात जाएट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा यूपी वॉरियर्सच्या ८ षटकात २ बाद ५५ धावा झाल्या होत्या.

<><><><><><>

गुजरातमध्ये आज स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदान झालं. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एकूण ५ हजार ८४ उमेदवार लढत आहेत. त्यापैकी आज २ हजार ८ जागांसाठी मतदान झालं. याखेरीज १७० जागा आधीच बिनविरोध घोषित करण्यात आल्या आहेत. आज सर्वत्र शांततेत मतदान झालं. मतदारांची गैरसोय होऊ नये, यासाठी निवडणूक आयोगाने मतदान केंद्रांवर विशेष व्यवस्था देखील केली होती. निवडणुकीदरम्यान कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी १० हजारांहून अधिक पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

<><><><><><>

दिल्ली पोलिस विभागाचा ७८वा स्थापना दिन म्हणजेच रायझिंग डे आज उत्साहात पार पडला. केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. दिल्ली पोलीस आयुक्त संजय अरोरा यांच्या उपस्थितीत पोलिसांनी राय यांना मानवंदना दिली. देशातील सर्वोत्तम पोलीसदलात दिल्ली पोलिसांचा समावेश होतो असं राय यांनी यावेळी सांगितलं. जी ट्वेंटी शिखर परिषद तसंच कोविड महामारीच्या काळात दिल्ली पोलिसांनी बजावलेल्या कामगिरीबद्दल त्यानी प्रशंसा केली.

**<><><><><><>**

महिलांनी पुढाकार घेतला, तर एखादी सहकारी बँक यशाच्या शिखरावर पोहचते, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज चंद्रपूर जिल्ह्यातल्या सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेच्या रौप्यमहोत्सवी वर्धापन दिन सोहळ्यात बोलत होते. महिलांना अर्थकारण चांगलं कळतं असं ते म्हणाले…

**होल्ड बाईट :- देवेन्द्र फडणवीस, मुख्यमंत्री (२८ सेकंद)**

चंद्रपूर जिल्ह्याचे संपर्क मंत्री अशोक उईकेही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><><>**

पूर्व माली मध्ये सोन्याची खाण कोसळून झालेल्या अपघातात ४८ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. स्थानिक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहिती नुसार काल डाबिया कम्युन मधल्या बिलाली कोटो इथं हा अपघात झाला. चीनी नागरिकांनी चालवलेली ही खाण कायदेशीर आहे की नाही याचा तपास अधिकारी करत आहेत.

**/<><><><><><>//**